**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५ )**

**बुधवार दिनांक २० मे २०२६**

**ठळक बातम्या..**

1. **अमेरिकेतले उद्योग राज्यातल्या अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रात गुंतवणूक करण्याच्या मानसिकतेत असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन**

2. **अखिल भारतीय औषध विक्रेता संघाच्या एकदिवसीय बंदला नागपूरसह विदर्भात प्रतिसाद**

3. **नागपूर जिल्हयातल्या ईशापूर गावाजवळ विटांनी भरलेला ट्रक उलटल्याने झालेल्या अपघातात तीन मजुरांचा मृत्यू**

4. **विदर्भात तीव्र उष्णतेची लाट; वर्ध्यात 46 पूर्णांक 7 दशांश अंश सेल्सिअस तापमानाची नोंद**

**आता सविस्तर बातम्या ......**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

अमेरिकेतले उद्योग राज्यातल्या अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रात गुंतवणूक करण्याच्या मानसिकतेत आहेत असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. खासगी कंपन्यांच्या सामाजिक जबाबदारी उपक्रमांमधून विविध लोककल्याणकारी योजना राबवण्यासाठी मुंबईत आयोजित टेक महाइंपॅक्ट या परिषदेच्या उद्घाटन सोहळ्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. ते म्हणाले....

उर्जेची गरज भागवण्यासाठी अणुऊर्जा आणि इतर पर्यायी स्रोतांचा वापर गरजेचा असल्याचं ते म्हणाले.

**जनगणना**

आगामी जनगणनेदरम्यान जातगणना करण्याचा केंद्रसरकारचा निर्णय रद्द करण्याची मागणी करणारी याचिका आज सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली. सरकारला कल्याणकारी योजना राबवण्यासाठी मागासवर्गीय लोकसंख्या नेमकी माहीत असणं गरजेचं आहे, असं मत प्रदर्शित करत सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या

नेतृत्वाखालील पीठानं सरकारच्या धोरणात्मक निर्णयात हस्तक्षेप करायला नकार दिला.

**तुकाराम मुंढे**

वरिष्ठ सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांची एफ डी ए, अर्थात अन्न आणि औषध प्रशासनाच्या आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. एफडीएचे आयुक्त श्रीधर दुबे यांची मुंबई महानगर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मुख्यकार्यकारी अधिकारी या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. तसंच आर एस चव्हाण यांना हाफकीन जीव औषध निर्माण महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे.

**अल्पसंख्यांक आयोग**

विकसित देश घडवण्यासाठी अल्पसंख्यांक समाज मजबूत आणि सुरक्षित असण अत्यंत गरजेचं आहे. आपल्या शेजारील काही देशांमध्ये अल्पसंख्यांकांची परिस्थिती चांगली नसल्यामुळे त्या देशांवर विविध संकटे निर्माण झाली असं प्रतिपादन महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष प्यारे जिया खान यांनी केलं. नवी दिल्ली इथं आयोजित अल्पसंख्यांक आयोगाच्या परिषदेत सहभागी झाल्यानंतर नागपुरात त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. दरवर्षी विविध अल्पसंख्यांक आयोगांना आपला अहवाल केंद्र सरकारला सादर करावा लागणार असल्याची माहिती त्यांनी दिली -

बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना शांतता आणि सामाजिक सलोखा कायम ठेवण्याच आवाहन खान यांनी यावेळी केलं. नवी दिल्ली येथे झालेल्या परिषदेत महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्य अल्पसंख्यांक आयोगाच्या कार्याची विशेष प्रशंसा करण्यात आल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

**औषध विक्रेते भारत बंद**

अखिल भारतीय औषध विक्रेता संघाने विविध मागण्यांसाठी आज एकदिवसीय देशव्यापी संप पुकारला आहे. ऑनलाईन औषध विक्री बंद करणं, कॉर्पोरेट्सद्वारे अव्यावसायिक सवलत देणं बंद करणं, आणि बनावट औषध विक्रीला आळा घालण, अशा औषध विक्रेत्यांच्या मागण्या आहेत. औषध विक्रीबाबत कठोर नियमावली आणि पारदर्शकता आवश्यक असून, यासाठी केंद्र सरकारने कायदे करावे, अशी

मागणीही संघटनेनं केली आहे. **नागपूर** जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या वतीने संविधान चौक इथं सकाळी ११ वाजता निदर्शने करण्यात आली.ऑनलाईन औषध विक्रीमुळे नियमांचे उल्लंघन होत असून, तरुणांमध्ये नशेचे प्रमाण वाढण्यास खतपाणी मिळत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. **बुलढाणा, आणि गोंदिया** जिल्ह्यात ऑनलाइन फार्मसी आणि बेकायदेशीर औषध विक्रीच्या विरोधात औषध विक्रेत्यांनी भारत बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. जिल्ह्यातील किरकोळ व घाऊक औषध विक्रेत्यांनी दुकाने बंद ठेवून मुक रॅली काढत निषेध नोंदविला. **अकोला** शहरासह जिल्ह्यातले अडीच हजारांहून अधिक औषध विक्रेते बंदमध्ये सहभागी झाले आहेत. मात्र, रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी काही निवडक औषधी दुकानं सुरू ठेवण्यात येणार असल्याची माहिती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली. **यवतमाळ** जिल्ह्यातील 2540 ठोक आणि रिटेलर औषध विक्री केंद्र चालक या बंदमध्ये सहभागी झाले असून काळ्या फीत बांधून त्यांनी निषेध नोंदविला. या बंदच्या पार्श्वभूमीवर रुग्णांची गैरसोय होऊ नये, यासाठी औषध आणि अन्न प्रशासनाने आवश्यक उपाययोजना केल्या असून, सर्व यंत्रणा सज्ज ठेवल्या आहेत. नागरीकांनी बंदच्या काळात अत्यावश्यक औषधांसाठी अन्न आणि औषध प्रशासनाच्या नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा, असं आवाहन करण्यात आलं आहे.

**अपघात**

नागपूर जिल्ह्यातल्या ईशापूर गावा जवळ आज पहाटे विटांनी भरलेला एक ट्रक उलटल्याने झालेल्या अपघातात तीन मजुरांचा मृत्यू झाला, तर तीन जण जखमी झाले आहेत. ईशापूर जवळ चालकाचं नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला. जखमींना जवळच्या सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. ट्रकचा चालक फरार झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

**बाळ विक्री**

गोंदियातील न्यू बालाजी हॉस्पिटलमध्ये अल्पवयीन मुलीची प्रसूती करून बाळ विक्री प्रकरणात डॉक्टर विवेक येळे आणि डॉक्टर आशा अग्रवाल यांच्यावर रामनगर पोलीस ठाण्यात पॉक्सो कायद्यासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुख्य आरोपी डॉक्टर नितेश बाजपेयीसह एकूण १० आरोपींविरुद्ध आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, डॉक्टर विवेक येळे यांना निलंबित करण्यात आल असून न्यू बालाजी हॉस्पिटलचा परवाना रद्द करून सोनोग्राफी सेंटर सील

करण्यात आल आहे. पोलिसांनी दोन बालकांची सुटका करून त्यांना बालकल्याण समितीकडे सुपूर्द केल आहे

**नीट युजी तपास**

नीट पेपरफुटी प्रकरणात सीबीआयनं काल नागपूर आणि चंद्रपूर जिल्ह्यात तीन विद्यार्थ्यांच्या घरांवर छापे टाकून झडती घेतली. या कारवाईदरम्यान, महत्त्वाची कागदपत्रं, हस्तलिखित नोट्स तसंच इलेक्ट्रॉनिक साहित्य जप्त करण्यात आलं. जप्त करण्यात आलेल्या नोट्स आणि फुटलेल्या प्रश्नपत्रिकांमध्ये साम्य आहे का, याची तपासणी आता फॉरेन्सिक पातळीवर केली जाणार आहे. देशभरातल्या किमान एक हजार विद्यार्थ्यांनी फुटलेले पेपर खरेदी केले असल्याचा सीबीआयचा अंदाज असल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे. दरम्यान, नीट युजी फेरपरीक्षेचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या अध्यक्षतेखाली काल नवी दिल्लीत उच्चस्तरीय बैठक झाली. ही परीक्षा, प्रामाणिकपणे आणि संपूर्ण पारदर्शकतेनं घेण्याचा पुनरुच्चार करत प्रधान यांनी परीक्षा प्रक्रियेत याआधी आढळून आलेल्या कोणत्याही त्रुटी न ठेवण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

**हवामान**

दुपारी अडीच वाजता मोजलेल्या तापमानानुसार 46. 7 दशांश अंश सेल्सिअसह आज वर्धा जिल्हा विदर्भात सर्वात उष्ण ठरला आहे.  वर्धा पाठोपाठ नागपूर इथं  45 पूर्णांक ६ दशांश सेल्सिअस, चंद्रपूर इथं  45. 4 तर गडचिरोली इथं 45. 2 दशांश सेल्सिअस इतक्या कमाल शुष्क तापमानाची नोंद करण्यात आली आहे.  तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. उर्वरित जिल्ह्यांपैकी अकोला इथं  44, अमरावतीत 44. 6, गोंदिया इथं 43 तर बुलढाणा जिल्ह्यात 40 अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं .वर्धा, अमरावती आणि अकोला या जिल्ह्यांमध्ये आज आणि उद्या तीव्र उष्णतेच्या लाटेचा रेड अलर्ट जारी करण्यात आला असून उद्या नागपूर, यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्ह्यात उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर अकोला, अमरावती आणि वर्धा इथं २४ तारखेपर्यंत ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. नागरिकांनी उष्णतेपासून बचाव करण्याचं आवाहन प्रशासनाने केलं  आहे

**क्रिकेट  संघ जाहीर**

अफगाणिस्तान विरुद्ध होणाऱ्या कसोटी आणि एकदिवसीय क्रिकेट सामन्यांसाठी भारतीय संघ जाहीर झाला. दोन्ही प्रकारांसाठी कर्णधार म्हणून शुभमन गिल तर

उपकर्णधारपदी के.एल. राहुलची निवड करण्यात आली. कसोटी आणि एकदिवसीय सामन्यांसाठी जसप्रित बुमराह आणि रवींद्र जडेजा यांना विश्रांती दिली आहे तर एकदिवसीय संघातून ऋषभ पंत याला वगळलं आहे. नवोदित फिरकी गोलंदाज मानव सुथार आणि वेगवान गोलंदाज गुरनुर ब्रार यांना कसोटी संघात स्थान मिळालं आहे. एकदिवसीय सामन्यांत प्रिन्स यादव याची निवड झाली आहे

**नालेसफाई**

चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे मान्सूनपूर्व नालेसफाई मोहिमेला वेग आला असून शहरातील ६ मोठ्या आणि १० लहान नाल्यांच्या स्वच्छतेचं काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आलं आहे. मनपा आयुक्त अकुनुरी नरेश यांनी १५ जूनपूर्वी सर्व कामे पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. सध्या १२६ कर्मचारी, ३ जेसीबी आणि २ पोकलेनच्या मदतीनं गाळ आणि कचरा काढण्याचे काम सुरू असून नाल्यांवरील अतिक्रमण हटवण्यासाठीही विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.

**आढावा बठक**

भंडारा जिल्ह्यात मृद आणि जलसंधारण विभागाच्या विविध योजनांचा जिल्हास्तरीय आढावा जिल्हाधिकारी सावन कुमार यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. जलयुक्त शिवार अभियान 2.0 अंतर्गत जिल्ह्यातील 100 गावांमधील 99.79 टक्के कामे पूर्ण झाल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. एल-निनोच्या संभाव्य परिणामांच्या पार्श्वभूमीवर गाळमुक्त धरण, नालाखोलीकरण आणि जलसंधारणाची सर्व प्रलंबित कामे 15 जून पूर्वी पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित विभागांना दिले.

*****